## 1. कार्यकारी सारांश

### प्रस्तावना

1.1 परवाना मिळालेल्या पारेषण प्रणालीची स्थापना आणि कार्यान्वयन यांच्यासाठी महाराष्ट्र इस्टर्न ग्रिड विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड (एमईजीपीटीसीएल/याचिकाकर्ता) यांना आयोगाच्या आदेश दिनांकीत 14 सप्टेंबर, 2010 द्वारे पारेषण परवाना क्र. 1 सन 2010 देण्यात आलेला आहे.

1.2 महाराष्ट्राच्या उत्तरपूर्व भागातील औष्णिक वीज प्रकल्पामधून निर्माण होणारी वीज राज्याच्या मध्य आणि पश्चिम भागातील लोड सेंटर्स कडे वाहून नेण्याकरिता परवानाधारक पारेषण प्रणालीची आवश्यकता होती. 31 मार्च 2015 पर्यंत टप्प्यांटप्प्यांने एमईजीपीटीसीएलचे यशस्वीरित्या कार्यान्वयन करुन कथित उद्दिष्ट पूर्ण करण्यात आलेले आहे.

1.3 कमर्शियल ऑपरेशन डेटच्या (व्यावसायिक कार्यान्वयन तारीख) आधारावर भाडेदराची निश्चिती करण्यासाठी संपूर्ण पारेषण प्रणालीचे वेगवेगळ्या सेट्समध्ये विभाजन करण्यात आले होते. हे कार्यान्वयनाचे वेळापत्रक अशाप्रकारे आखण्यात आले होते की यापैकी प्रत्येक सेट हा त्याच्या कार्यान्वयनाच्या तारखेपासून विजेचे पारेषण करण्याच्या दृष्टीने स्वतंत्ररीत्या सक्षम असेल आणि तो आंतरराज्य पारेषण प्रणालीचा (आयएनएसटीएस) एक महत्त्वाचा भाग होईल.

### वैधानिक तरतुदी

1.4 याचिकाकर्ते हे पारेषण परवानाधारक असल्यामुळे निर्देशित नियामक कार्यपद्धती अंतर्गत कामकाज करण्यात प्रयत्न करतात. पारेषण व्यवसायाचे खालील कायदे, धोरणे व नियमावल्या यांचा अंतर्गत अनुशासन व नियमन होते:

- विद्युत कायदा 2003;
- राष्ट्रीय विद्युत धोरण;
- राष्ट्रीय टॅरिफ पॉलिसी; आणि
- एमईआरसी (बहुवर्षीय टॅरिफ) रेग्युलेशन्स, 2015
- एमईआरसी (बहुवर्षीय टॅरिफ) रेग्युलेशन्स, 2019 आणि
- एमईआरसी (बहुवर्षीय टॅरिफ) रेग्युलेशन्स, 2024

1.5 सन्माननीय आयोगाने विद्युतनिर्मिती, पारेषण व वितरण यांचे टॅरिफ निश्चित करण्यासाठी 19.08.2024 रोजी एमवायटी रेग्युलेशन्स, 2024 निर्देशित केले आहेत.

1.6 वरील गोष्टी विचारात घेता एमईजीपीटीसीएल पुढील गोष्टी सादर करीत आहे

(ए) एमवायटी रेग्युलेशन्स, 2019 च्या तरतुदीनुसार वित्तिय वर्ष 2022-23 आणि 2023-24 यांच्या एआरआरच्या ट्रु-अपसाठी याचिका.

(बी) एमवायटी रेग्युलेशन्स, 2019 च्या तरतुदीनुसार वित्तिय वर्ष 2024-25 च्या एआरआरच्या तात्पुरत्या ट्रु-अपसाठी याचिका.

(सी) एमवायटी रेग्युलेशन्स 2024 च्या तरतुदीनुसार वित्तिय वर्ष 2025-26 ते वित्तिय वर्ष 2029-30 साठी एआरआरचा अंदाज ठरविणे.

(डी) लागू एमवायटी नियम (2015 आणि 2019) नुसार वित्तिय वर्ष 2019-20 ते वित्तिय वर्ष 2021-22 साठी 765 केव्ही एक्टुनी एस/एस् येथील 2x765 केव्ही बेज साठी एमएसईटीसीएल यांच्या अतिरिक्त डिमांड नोट्ससाठी वहन खर्चासह अतिरिक्त आर्थिक परिणाम (रिलीफ).

### ट्रु-अप, तात्पुरता ट्रु-अप आणि एआरआरच्या अंदाजाच्या हिशेबाचा आधार

1.7 सन्माननीय आयोगाने वर्ष 2022 च्या प्रकरण क्र. 237 साठी दिनांक 31 मार्च 2023 या तारखेस वित्तिय वर्ष 2019-20 साठी मंजूर केलेल्या सुरुवातीच्या भांडवल खर्चानुसार, वित्तिय वर्ष 2019-20 ते वित्तिय वर्ष 2021-22 चे अगोदरचे ट्रू-अप, वित्तिय वर्ष 2022-23 आणि वित्तिय वर्ष 2023-24 साठी एआरआर चे ट्रू-अप, वित्तिय वर्ष 2024-25 साठी एआरआरचे हंगामी ट्रू-अप, आणि वित्तिय वर्ष 2025-26 ते वित्तिय वर्ष 2029-30 साठी एआरआरचा अंदाज यावर अतिरिक्त परिणाम याचिकाकर्त्यांनी निश्चित केला आहे. वित्तिय वर्ष 2022-23आणि वित्तिय वर्ष 2023-24 यांच्या लेखा परिक्षित वार्षिक लेखा **अनुक्रमे परिशिष्ट 1 आणि परिशिष्ट 2** मध्ये दिलेल्या आहेत.

1.8 वित्तिय वर्ष 2019-20 च्या दरम्यानच्या 765 केव्ही एक्टुनी एस्/एस् येथील 2x765 केव्ही बेज साठी रु. 31.31 कोटीच्या एमएसईटीसीएल यांच्या अतिरिक्त डिमांड नोट्ससाठी वहन खर्चासह अतिरिक्त वित्तिय जबाबदारी (रिलीफ), वित्तिय वर्ष 2019-20 ते वित्तिय वर्ष 2021-22 च्या एआरआरमध्ये बदल झाला आहे. सन्माननीय आयोगाने वित्तिय वर्ष 2019-20 चे ट्रू-अप अगोदरच केले असल्यामुळे, खालील तक्त्यात कॅरिंगच्या (वहन) खर्चासह फरकाची रक्कम दाखविण्यात आली आहे:

**कोष्टक 1-1: वित्तिय वर्ष 2019-20 ते वित्तिय वर्ष 2021-22 मधील एमएसईटीसीएल द्वारा केलेल्या केपेक्सच्या अतिरिक्त दाव्यामुळे वित्तिय वर्ष 2025-26 च्या दरम्यान अतिरिक्त वसुली (रु. कोटी)**

| अनु क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| 1 | वित्तिय वर्ष 2019-20 ते वित्तिय वर्ष 2021-22 साठी सुधारीत ट्रुड अप एआरआर | 14.68 |
| 2 | वित्तिय वर्ष 2019-20 ते वित्तिय वर्ष 2021-22 साठी सुधारित ट्रुड अप एआरआरचा वहन खर्च | 6.79 |
| 3 | वित्तिय वर्ष 2019-20 या काळासाठी मंजूर झालेल्या इन्सेन्टिव्ह वरील परिणाम | 0.02 |
| 4 | वसुल करावयाच्या अतिरिक्त मोबदल्यासाठी वहन खर्च | 0.01 |
| 5 | वित्तिय वर्ष 2019-20 मधील मागील बाकी वसुलीवर @ 17.472% दराने आयकराचा अंदाजे परिणाम | 1.32 |
| **6** | **वित्तिय वर्ष 2019-20 ते वित्तिय वर्ष 2021-22 मधील एमएसईटीसीएल द्वारा केलेल्या केपेक्सच्या अतिरिक्त दाव्यामुळे वित्तिय वर्ष 2025-26 च्या दरम्यान अतिरिक्त वसुली** | **22.82** |

1.9 वरील बाबी विचारात घेता वित्तिय वर्ष 2022-23 साठी याचिकाकर्त्यांचा ट्रुड अप एआरआर खालील कोष्टकामध्ये मांडण्यात आला आहे:

**कोष्टक 1-2: वित्तिय वर्ष 2022-23 साठी एआरआरचे ट्रु अप (रु. कोटी)**

| अनु क्र. | तपशील | प्रकरण 237 सन 2022 दिनांकीत 31.03.2023 | सुधारीत नॉर्मेटिव्ह/ प्रत्यक्ष | प्रत्यक्ष | फेरबदल | नियंत्रण करता येण्या-सारखा | नियंत्रण करता न येण्या-सारखा | लाभ/(हानी) वाटप केल्यानंतर निव्वळ देय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ए | बी | सी | डी = सी-ए | ई = डी-एफ | एफ = बी-ए | जी = ए + ई/3 + एफ |
| 1 | कामकाज व देखभाल खर्च | 115.71 | 115.71 | 139.80 | 24.09 | 24.09 | - | 123.74 |
| 2 | घसारा खर्च | 304.13 | 306.30 | 306.30 | 2.17 | | 2.17 | 306.30 |
| 3 | दीर्घकालिक कर्ज भांडवलावरील व्याज | 205.19 | 217.19 | 217.19 | 12.00 | | 12.00 | 217.19 |
| 4 | खेळते भांडवळ व सिक्युरीटी डिपॉझिट्स (तारण ठेवी) वरील व्याज | 17.18 | 17.12 | - | (17.18) | (17.12) | (0.06) | 5.71 |
| 5 | आयकर | - | - | - | - | | - | - |
| 6 | आकस्मिक निधीसाठी राखीव योगदान | 14.46 | 14.80 | 14.80 | 0.34 | | 0.34 | 14.80 |
| **7** | **एकूण महसुली खर्च** | **656.67** | **671.11** | **678.08** | **21.41** | **6.97** | **14.44** | **667.73** |
| 8 | समभाग भांडवलावरील परतावा | 294.48 | 328.01 | 328.01 | 33.53 | | 33.53 | 328.01 |
| **9** | **एकंदर महसुली आवश्यकता** | **951.15** | **999.13** | **1,006.10** | **54.94** | **6.97** | **47.97** | **995.74** |
| 10 | वजा: बिगर- टॅरिफ उत्पन्न | 4.62 | 3.95 | 3.95 | (0.67) | | (0.67) | 3.95 |
| 11 | वजा: इतर व्यवसायापासून उत्पन्न | - | - | - | - | | - | - |
| **12** | **ट्रान्समिशन टॅरिफ कडून एकंदर महसुली आवश्यकता** | **946.53** | **995.18** | **1,002.15** | **55.61** | **6.97** | **48.64** | **991.79** |

1.10 वरील बाबी विचारात घेता वित्तिय वर्ष 2023-24 साठी याचिकाकर्त्याचा ट्रुड अप एआरआर खालील कोष्टकामध्ये मांडण्यात आला आहे:

**कोष्टक 1-3: वित्तिय वर्ष 2023-24 साठी एआरआरचे ट्रु अप (रु. कोटी)**

| अनु क्र. | तपशील | प्रकरण 237 सन 2022 दिनांकीत 31.03.2023 | सुधारीत नॉर्मेटिव्ह/ प्रत्यक्ष | प्रत्यक्ष | फेरबदल | नियंत्रण करता येण्या-सारखा | नियंत्रण करता न येण्या-सारखा | लाभ/(हानी) वाटप केल्यानंतर निव्वळ देय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **ए** | **बी** | **सी** | **डी = सी-ए** | **ई = डी-एफ** | **एफ = बी-ए** | **जी = ए + ई/3 + एफ** |
| 1 | कामकाज व देखभाल खर्च | 119.95 | 119.95 | 146.54 | 26.59 | 26.59 | - | 128.82 |
| 2 | घसारा खर्च | 304.25 | 306.97 | 306.97 | 2.72 | | 2.72 | 306.97 |
| 3 | दीर्घकालिक कर्ज भांडवलावरील व्याज | 166.84 | 177.03 | 177.03 | 10.19 | | 10.19 | 177.03 |
| 4 | खेळते भांडवळ व सिक्युरीटी डिपॉझिट्स (तारण ठेवी) वरील व्याज | 26.11 | 28.07 | 26.79 | 0.68 | (1.28) | 1.96 | 27.22 |
| 5 | आयकर | - | - | - | - | | - | - |
| 6 | आकस्मिक निधीसाठी राखीव योगदान | 14.47 | 13.84 | 13.84 | (0.63) | | (0.63) | 13.84 |
| **7** | **एकूण महसुली खर्च** | **631.62** | **645.87** | **671.17** | **39.55** | **25.31** | **14.24** | **653.88** |
| 8 | समभाग भांडवलावरील परतावा | 294.59 | 328.41 | 328.41 | 33.82 | | 33.82 | 328.41 |
| **9** | **एकंदर महसुली आवश्यकता** | **926.21** | **974.28** | **999.59** | **73.37** | **25.31** | **48.07** | **982.29** |
| 10 | वजा: बिगर- टॅरिफ उत्पन्न | 5.54 | 3.19 | 3.19 | (2.35) | | (2.35) | 3.19 |
| 11 | वजा: इतर व्यवसायापासून उत्पन्न | - | - | - | - | | - | - |
| **12** | **ट्रान्समिशन टॅरिफ कडून एकंदर महसुली आवश्यकता** | **920.67** | **971.09** | **996.40** | **75.72** | **25.31** | **50.42** | **979.10** |

1.11 याचिकाकर्ता आपले ध्यान एमवायटी रेग्युलेशन 2019 च्या रेग्युलेशन क्र. 29.7 कडे वेधू इच्छीतात, ज्यामध्ये अशी तरतूद आहे की पारेषणाची उपलब्धता असल्यास इक्विटीच्या परताव्यावर अतिरिक्त/वाढीव दर दिला जाऊ शकेल. ही बाब विचारात घेऊन याचिकाकर्त्याने वित्तिय वर्ष 2022-23 व वित्तिय वर्ष 2023-24 साठी अनुक्रमे 99.85% आणि 99.79% एवढी पारेषण उपलब्धता प्राप्त केली आहे आणि त्यानुसार इक्विटीच्या परताव्यावर वाढीव दराची मागणी केली आहे. एमएसएलडीसी यांच्याकडून याचिकाकर्त्याला वित्तिय वर्ष 2022-23 व वित्तिय वर्ष 2023-24 साठी देण्यात आलेले वार्षिक उपलब्धता प्रमाणपत्र या याचिकेसोबत **परिशिष्ट 3** म्हणून जोडलेले आहे.

1.12 **वित्तिय वर्ष 2022-23 आणि वित्तिय वर्ष 2023-24 साठी एआरआरच्या ट्रूअपचा समरी खालील तक्त्यात देण्यात आला आहे:**

**कोष्टक 1-4: वित्तिय वर्ष 2022-23 आणि वित्तिय वर्ष 2023-24 साठी ट्रु अप समरी (रु. कोटी)**

| अनु क्र. | तपशील | सूत्र | वित्तिय वर्ष 2022-23 साठी प्रत्यक्ष | वित्तिय वर्ष 2023-24 साठी प्रत्यक्ष |
|---|---|---|---|---|
| 1 | ट्रुईंग अप नंतर आणि नफा/तोटा यांचे वाटप झाल्यावर परवानगी असणारा एआरआर | ए | 991.79 | 979.10 |
| 2 | एमवायटी आदेश प्रकरण 290 सन 2019 मध्ये मंजूर केलेली आधीच्या कालावधींची तफावत | बी | 39.75 | 746.58 |
| 3 | वित्तिय वर्ष 2019-20 आणि अगोदरच्या वसुलीसाठी अतिरिक्त आयकर | सी | | 226.02 |
| **4** | **ट्रुईंग अप नंतर आणि नफा/तोटा व आधीची वसुली यांचे वाटप झाल्यावर परवानगी असणारा एआरआर** | **डी = ए + बी +सी** | **1,031.54** | **1,951.69** |
| 5 | वजा : इन एसटीएस आदेशानुसार महसूल | **ई = सी + डी** | 914.17 | 1,667.25 |
| 6 | **वहन खर्च/ (धारणा) खर्च याच्या हिशोबासाठी महसुलातील तफावत/ (वृध्दी)** | **एफ= सी-ई** | **117.37** | **284.44** |
| 7 | 2022 च्या प्रकरण क्र. 237 च्या आदेशात हंगामी ट्रू-अपची वसुली करण्याची परवानगी देण्यात आली आहे | जी | 72.11 | - |
| 8 | महसुलातील तफावत / (वाढ) यामुळे वहन / (धारणा) खर्च | एच | 20.74 | 58.90 |
| 9 | **वहन खर्च आणि उपलब्धता इन्सेन्टिव्ह यांच्या समावेशासह वसुल करावयाची निव्वळ महसुल तफावत** | **आय = एफ- जी + एच** | **66.00** | **343.35** |

1.13 वित्तिय वर्ष 2024-25 च्या बाबतीत एमईजीपीटीसीएल यांनी एमवायटी आदेशामधील मंजुर झालेल्या एआरआरची दुसऱ्या अर्धवर्षाचे अंदाज आणि अलेखापरिक्षित अर्धवार्षिक लेखा यांच्या आधारे पहिल्या अर्धवर्षाच्या प्रत्यक्ष कामगिरीबरोबर तुलना केलेली आहे. वित्तिय वर्ष 2024-25 चे मंजुर झालेले आणि सुधारीत एआरआर यांची तुलना खालील कोष्टकामध्ये करण्यात आलेली आहे:

**कोष्टक क्र. 1-5: वित्तिय वर्ष 2024-25 च्या मंजूर झालेल्या व अंदाजे एआरआरची तुलना (रु. कोटी)**

| तपशील | वित्तिय वर्ष 2024-25 | | |
|---|---|---|---|
| | मंजूर (प्रकरण 237 सन 2022) | अंदाजे | तात्पुरता ट्रु-अप आवश्यकता |
| कार्यान्वयन व देखभाल खर्च | 124.33 | 124.33 | - |
| घसारा खर्च | 304.35 | 307.41 | 3.06 |
| दीर्घकालीन भांडवली कर्जावरील व्याज | 128.44 | 136.85 | 8.41 |
| खेळते भांडवल आणि ग्राहकांचे सिक्युरीटी डिपॉझिट यावरील व्याज | 26.13 | 28.94 | 2.81 |
| आयकर | - | - | - |
| आकस्मिक निधीसाठी राखीव योगदान | 14.48 | 14.57 | 0.09 |
| **एकूण महसुली खर्च** | **597.74** | **612.09** | 14.35 |
| समभाग भांडवलावरील परतावा | 294.69 | 296.87 | 2.18 |
| **एकंदर महसुली आवश्यकता** | **892.43** | **908.97** | **16.53** |
| वजा: बिगर-टॅरिफ उत्पन्न | 6.46 | 6.60 | 0.14 |
| वजा: इतर व्यवसायापासून उत्पन्न | - | - | - |
| वजा: ओपन ॲक्सेस चार्जेसपासून उत्पन्न | - | - | - |
| **पारेषण टॅरिफपासून एकंदर महसुली आवश्यकता** | **885.97** | **902.37** | **16.39** |

**कोष्टक 1-6: वित्तिय वर्ष 2024-25 साठी तात्पुरता ट्रु अप (रु. कोटी)**

| अनु क्र. | तपशील | सूत्र | वित्तिय वर्ष 2024-25 |
|---|---|---|---|
| 1 | ट्रुईंग अप नंतर आणि नफा/तोटा यांचे वाटप झाल्यावर परवानगी असणारा एआरआर | ए | 902.37 |
| 2 | एमवायटी आदेश प्रकरण 237 सन 2022 मध्ये मंजूर केलेली आधीच्या कालावधींची तफावत | बी | 780.20 |
| **3** | **ट्रुईंग अप नंतर आणि नफा/तोटा व आधीची वसुली यांचे वाटप झाल्यावर परवानगी असणारा एआरआर** | **सी = ए + बी** | **1,682.57** |
| 4 | वजा : इन एसटीएस आदेशानुसार महसूल | डी | 1,666.17 |
| 5 | **वहन खर्च / (धारणा) खर्च याच्या हिशोबासाठी महसुलातील तफावत / (वृध्दी)** | **ई = सी - डी** | **16.40** |

1.14 वर्तमान याचिकेमध्ये याचिकाकर्त्याने वित्तिय वर्ष 2024-25 साठी कोणत्याही वहन खर्चाबाबत दावा केलेला नाही.

1.15 वित्तिय वर्ष 2025-26, वित्तिय वर्ष 2026-27, वित्तिय वर्ष 2027-28, वित्तिय वर्ष 2028-29, आणि वित्तिय वर्ष 2029-30, साठी एआरआरचे सुधारीत अंदाज खालील कोष्टकांमध्ये देण्यात आलेले आहेत:

**कोष्टक 1-7: वित्तिय वर्ष 2025-26 ते वित्तिय वर्ष 2029-30 साठी एआरआरचा समरी (रु. कोटी)**

| तपशील | वित्तिय वर्ष 2025-26 | वित्तिय वर्ष 2026-27 | वित्तिय वर्ष 2027-28 | वित्तिय वर्ष 2028-29 | वित्तिय वर्ष 2029-30 |
|---|---|---|---|---|---|
| कार्यान्वयन व देखभाल खर्च | 134.90 | 158.65 | 184.91 | 192.32 | 200.88 |
| घसारा खर्च | 236.17 | 231.09 | 135.46 | 135.26 | 134.71 |
| भांडवली कर्जावरील व्याज | 104.11 | 108.07 | 115.93 | 98.00 | 80.11 |
| खेळत्या भांडवलावरील व्याज | 24.07 | 18.97 | 19.39 | 19.30 | 19.23 |
| आयकर | | | | | |
| आकस्मिक निधीसाठी राखीव योगदान | 14.60 | 14.75 | 16.48 | 16.48 | 16.48 |
| **एकूण महसुली खर्च** | **513.84** | **531.52** | **472.17** | **461.37** | **451.41** |
| अधिक: समभाग भांडवलावरील परतावा | 330.67 | 351.88 | 371.41 | 371.41 | 371.41 |
| **एकंदर महसुली आवश्यकता** | **844.51** | **883.40** | **843.58** | **832.77** | **822.82** |
| वजा: बिगर टॅरिफ उत्पन्न | 7.55 | 8.51 | 9.59 | 10.66 | 11.74 |
| वजा: इतर व्यवसायापासून उत्पन्न | | | | | |
| वजा: ओपन ॲक्सेस चार्जेसपासून उत्पन्न | | | | | |
| **पारेषणाकडून एकंदर महसुली आवश्यकता** | **836.96** | **874.89** | **833.99** | **822.11** | **811.09** |

1.16 याचिकाकर्त्याला असे निवेदन करावयाचे आहे की वित्तिय वर्ष 2025-26 ते वित्तिय वर्ष 2029-30 चा संचित एआरआर (महसुली तफावत/(नफा) यांचा समावेश असणारा) खालीलप्रमाणे आहे:

**कोष्टक 1-8: वित्तिय वर्ष 2025-26 ते वित्तिय वर्ष 2029-30 साठी संचित एआरआर (रु. कोटी)**

| अनु क्र. | तपशील | वित्तिय वर्ष 2025-26 | वित्तिय वर्ष 2026-27 | वित्तिय वर्ष 2027-28 | वित्तिय वर्ष 2028-29 | वित्तिय वर्ष 2029-30 |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | वर्तमान याचिकेमधील एआरआर | 836.96 | 874.89 | 833.99 | 822.11 | 811.09 |
| 2 | वित्तिय वर्ष 2022-23 साठी महसुली तफावत / (वृध्दी) | 45.26 | | | | |
| 3 | वित्तिय वर्ष 2022-23 च्या महसुली तफावत / (वृध्दी) वरील वहन खर्च | 20.74 | | | | |
| 4 | वित्तिय वर्ष 2023-24 साठी महसुली तफावत / (वृध्दी) | 284.44 | | | | |
| 5 | वित्तिय वर्ष 2023-24 च्या महसुली तफावत / (वृध्दी) वरील वहन खर्च | 58.90 | | | | |
| 6 | वित्तिय वर्ष 2024-25 साठी महसुली तफावत / (वृध्दी) | 16.40 | | | | |
| 7 | वित्तिय वर्ष 2019-20 ते वित्तिय वर्ष 2021-22 साठी एक्टुनी बेजच्या अतिरिक्त भांडवलीकरणामुळे कॅरिंगच्या (वहन) खर्चासह महसुलातील तूट | 22.82 | | | | |
| **8** | **वर्तमान याचिकेमधील इन एसटीएस महसुली** | **1,285.52** | **874.89** | **833.99** | **822.11** | **811.09** |

**सन्माननीय आयोगाकडे प्रार्थना**

वरील वस्तुस्थिती आणि परिस्थिती विचारात घेऊन सन्माननीय आयोगाने पुढील गोष्टी कराव्यात अशी प्रार्थना याचिकाकर्ता करीत आहे:

(ए) वर्तमान याचिका दाखल करून घेणे.

(बी) ह्या याचिकेमध्ये दावा केलेला अतिरिक्त भांडवली खर्च मंजुर करण्यात यावा.

(सी) 765 केव्ही एक्टुनी एस/एस् येथील 2x765 केव्ही बेज साठी एमएसईटीसीएल यांच्या अतिरिक्त डिमांड नोटिसमुळे कॅरिंगच्या (वहन) खर्चासह अतिरिक्त आर्थिक परिणाम (रिलीफ)ची अनुमती द्यावी.

(डी) वित्तिय वर्ष 2022-23 आणि वित्तिय वर्ष 2023-24 साठी इक्विटीवरील अतिरिक्त परतावा आणि वहन खर्च यांच्यासह एआरआरच्या ट्रु अपला मंजुरी.

(ई) वित्तिय वर्ष 2023-24च्या एआरआरमध्ये कॅरिंगच्या (वहन) खर्चासह परवानगी दिलेल्या वित्तिय वर्ष 2019-20 पर्यंत संबंधित वसुलीवरील एकुण आयकराची अनुमती द्यावी.

(एफ) एमईआरसी (भांडवली गुंतवणूक योजनेला मंजुरी) अधिनियम, 2022 मधील तरतुदींनुसार आर्थिक वर्ष 2022-23 ते आर्थिक वर्ष 2029-30 साठी पुढे सुरू ठेवलेल्या/प्रस्तावित भांडवली खर्चाला मंजुरी.

(जी) एमईआरसी (भांडवली गुंतवणूक योजनेला मंजुरी) अधिनियम, 2022 मधील नियम 21 नुसार आर्थिक वर्ष 2024-25 ते आर्थिक वर्ष 2026-27 साठी प्रस्तावित डेल्टा टाईफ टॉवरच्या मजबुतीसाठी भांडवली खर्चाला मंजुरी.

(एच) या याचिकेमध्ये सूचित केल्यानुसार वित्तिय वर्ष 2024-25 च्या एआरआरच्या तात्पुरत्या ट्रु-अपला मंजुरी देणे.

(आय) या याचिकेमध्ये सूचित केल्यानुसार वित्तिय वर्ष 2025-26 ते वित्तिय वर्ष 2029-30 साठी एआरआरच्या अंदाजाला मंजुरी देणे.

(जे) लागू होणाऱ्या वहन खर्चासह वरील विनंतीच्या प्रभावाची वसुली टीएसयूज्कडून करण्यास परवानगी देणे.

(के) अनवधानाने कोणत्याही त्रुटी/चुका/कमतरता राहून गेल्या असल्यास त्यांना क्षमा करणे आणि पुढील तारखेस आवश्यकता वाटेल त्यानुसार या सादरीकरणामध्ये वाढ/बदल/दुरुस्ती/फेरफार करण्यासाठी व त्यानंतर पुन्हा ती सादर करणे यासाठी एमईजीपीटीसीएल यांना परवानगी देणे.

(एल) सन्माननीय आयोगाला देण्यास योग्य वाटेल अशी इतर कोणतीही सूट, आदेश किंवा निर्देश देण्यास परवानगी देणे.

(एम) या प्रकरणातील वस्तुस्थिती आणि परिस्थिती लक्षात घेऊन सन्माननीय आयोगाला उचित आणि योग्य वाटतील अशाप्रकारे यापुढील आदेश मंजूर करणे.